Special Issue August 2019

विद्यावार्ता®

Peer Reviewed International Refereed Research Journal

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
आणि
भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे

# खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई

यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी विषयार्तंगत राष्ट्रीय चर्चासत्र

# वैचारिक मराठी साहित्य :
## शोध, स्वरुप व अभिव्यक्ती

संपादक
डॉ.देविदास खोडेवाड

Scanned with OKEN Scanner

# अनुक्रमणिका

01) वैचारिक साहित्याचे स्वरुप आणि स्थित्यंतरे
डॉ.कैलास इंगळे,औरंगाबाद. ||18

02) वैचारिक मराठी साहित्य : शोध स्वरूप व अभिव्यक्ती
गायत्री आनंदराव भरनाळे, औरंगाबाद ||21

03) वारकरी साहित्याची चळवळ : दशा आणि दिशा
प्रा. शेटकार रामशेट्टी राजेंद्र, उमरगा ||26

04) समकालीन मराठी जैन कथा साहित्य चळवळ
डॉ.अलका प्रदीप वालचाळे (सरोदे), अंबाजोगाई ||30

05) दलित चळवळतील परिवर्तनवादी दलित साहित्य
हत्तिअंबीरे प्रदिपकुमार मारोती, नांदेड ||34

06) वारकरी संप्रदायात संत तुकारामांचे योगदान
डॉ.राखी सिद्राम सलगर (प्राध्यापिका), औरंगाबाद. ||36

07) जीवनपुर्तीच्या कर्तव्यनिष्ठ तत्वज्ञानाचे सार : महात्मा बसवेश्वरांचे 'कायकवेकैलास' तत्व
प्रा.डॉ.गुंडरे दादाराव एकनाथ,उस्मानाबाद. ||39

08) समर्थ रामदासांच्या दासबोधातील वैचारिकतेचे स्वरुप आणि अभिव्यक्ती पध्दती
प्रा. डॉ. मधुकर क्षीरसागर,बीड. |41

09) मराठी मुस्लीम वैचारिक्साहित्य पूर्वपरंपरा व व्याप्ती
शेख म. रफी म. युसूफ, पुणे ||45

10) वारकरी चळवळ आणि वैचारिकता
डॉ.ज्ञानेश्वर को.गवते, माजलगाव ||51

11) परिवर्तनाचा वाटसरू : कृष्णराव भालेकर
प्रा.डॉ.गोविंद काळे,लातूर. ||56

12) आधुनिक महाराष्ट्रातील प्रबोधनकारी विचारवंत - संत गाडगेबाबा
प्रा.डॉ.राजकुमार किशनराव यल्लावाड, बीड ||60

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Scanned with OKEN Scanner

07

# जीवनपुर्तीच्या कर्तव्यनिष्ठ तत्वज्ञानाचे सार : महात्मा बसवेश्वरांचे 'कायकवेकैलास' तत्व

**प्रा.डॉ.गुंडरे दादाराव एकनाथ**
(मराठी विभागप्रमुख)
शिक्षणमहर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय
कळंब जि. उस्मानाबाद.

***********

बाराव्या शतकातीलएक श्रेष्ठ संत, कवी, क्रांतीकारक, कळकळीचे समाजसुधारक, उत्कृष्ट प्रशासक, उत्तम संघटक, उत्तम राजनितिज्ञ, प्रमुख अध्यात्मिकगुरू, मानवतेचे पुजारीतसेच या काळी समाजवादाचा पाया घालणारे महान व्यक्तिमत्व. 'महात्मा' या पदवीने गौरविले जाणारे पुण्यपुरूष होत. लोकांनी विचार मंथन करावे, तत्वचिंतन करावे, आत्मशोधन करावे, आत्मपरीक्षण करावे आणिविवेकाच्या वाटेने चालत राहावे, सद्बुद्धी हाच खरा मार्गदर्शक व पथदर्शक म्हणून निर्णयघ्यावेत. अशा प्रकारचे सर्वजनसुलभ, सर्व कल्याणकारी तत्वज्ञान सादरकेले. जेतत्वज्ञान सांगीतले त्यामध्ये विशेष करून मनाच्या शुद्धतेसाठी 'अनुभवमंटप' आणि शरीराच्या शुद्धतेसाठी 'कायकवेकैलास' या दोन गोष्टी सांगीतल्या. स्वतः ते तत्वानेष्ठ, कायकनिष्ठ होते. 'श्रम हीच देवता' अशा शब्दात 'कार्यकवेकैलास' चा अर्थ सांगीतला.कायकनिष्ठ शरण संस्कृती कल्याण राज्यात रूजविण्याचे काम केले. कल्याणला साक्षात भूकैलास कार्यभूमी केली. सत्य, शुद्ध, नित्य व पवित्र समाजोपयोगी उद्योगी शरीरश्रम म्हणजेच कायक. अर्थात 'कायकवेकैलास' हे त्यांच्या शरण चळवळीचे ब्रीद होते. हा कानमंत्र, जीवनमंत्र व आचार सूत्र विविध जाती धर्मातील शरण-शरणींनी स्वीकारल्याचे वचन साहित्यातून प्रकटकेलेल्या कायकानुभूतीच्या अविष्कारातून दिसून येते.

स्वतः महात्मा बसवेश्वर विज्वळीच्या पदरी खजिनदार होते. तरीही लौकिक व्यवहार मात्रकायकव्रतच होता. कोणताही व्यवसाय हा धर्माचरणात आधारभूत मानून त्यातून ईश्वर प्राप्तीचा मार्ग तयार होतो. अशा विचारा चाकायकवेकैलास असल्याचे स्पष्ट केले.

कोणत्याही लिंग, धर्म यांचा अडथळा न येऊ देता सर्वांनाच धर्माचीदारे खुली करण्याचे काम ११५२ मध्ये त्यांनी स्थापन केलेल्या ' अनुभवमंटप' सारख्या सामाजिक धार्मिक विचार पीठाने केले. त्यांनी उभारलेले 'अनुभवमंटप' हे एक विचार मंदिर, समाज मंदिर होते. या मंदिरात अबालवृद्ध, रंक-राव, स्त्री-पुरूष एकच मंत्रजपत होते. एकचतत्व आचरत होते ते म्हणजे 'कायकवेकैलास'. या संस्कारपीठातून सर्व अनुयायांना हे आचारसूत्र सांगीतले. कायेने आचरलेले व्यवसाय, कर्म याला ते 'कायक' म्हणत. प्रत्येकाने आपपले कर्तव्य कायेने व मनाने करावे हा प्रधानविचार मूळाशी आहे. थोर विचारवंत प्राचार्य शिवाजीराव भोसले महात्मा बसवेश्वरांच्या 'कायकवेकैलास' चा तत्वबोधाचा आढावा घेताना "काया हे धर्मसाधन आहे. काया ही माया नाही किंवा जीवनाची पडछाया नाही. कायेचा त्याग करणे, तिरस्कार करणे, उपेक्षा करणे हे अविचाराचे लक्षण आहे. काया हे चंदन आहे. आपल्या कर्तव्यावर, सहाणेवर ते उगाळून त्याचे लेपण भगवंतास करावे" अशा शब्दातून या तत्वाचा आशय, मूलगर्भ विचार प्रकट केला.

त्यांनी स्थापनकेलेल्या 'अनुभवमंटप' विचारपीठाचे 'कायकवेकैलास' ब्रीद होते. प्रत्येक कायक हा नवनिर्मितीचा केंद्रबिंदू मानला. 'श्रम है श्रीराम हमारा' असा कर्मयोगी बाबा आमटेंनी दिलेला संदेश. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींना सांगीतलेले 'शरीरश्रम' हे तत्व किंवा कार्लाईल सारख्या विचारवंताने सांगीतलेले 'श्रम हीच देवपुजा' हे तत्व. याप्रमाणे महात्मा बसवेश्वरांनी 'कर्म हाच कैलास, श्रम हाच स्वर्ग' असल्याचे 'कायकवेकैलास' या तत्वातून नमुद केले. कारण व्यक्तीची प्रतिष्ठा ही त्याच्या जन्मावरून न ठरता विचार, चारित्र्य, गुणतसेच कर्मांवरून ठरत असते.

महात्मा बसवेश्वरांनी आपल्या अनुयायांना उपदेशकेलाकी, 'कायकवेकैलास' याचा अर्थ शरीराने श्रम करून जीवन जगावे, काही तरी करावे, पेरावे, घडवावे. बसुन राहू नये. दारी लक्ष्मी पाणी भरत असली तरीही परिश्रम हीच पुजा मानावी. महात्मा बसवेश्वारांनी 'अनुभवमंटपाची' स्थापना केली व त्याद्वारे प्रत्यक्ष कृतीद्वारे जनजागृती केली. ते म्हणत, 'काया हे धर्मसाधन समजूनकष्ट करीत राहणे हाच खरा जीवन मार्ग होय. गरीब असोकी श्रीमंत अंगमेहनत केल्या शिवाय अन्न ग्रहण करू नये किंवा त्याशिवाय श्रमाची किंमत कळत नाही. शरीर श्रमा शिवाय आपल्याच धुंदीत व भ्रष्टाचारी मार्गाने जे जगजातत्या व्यक्ती अनाचारी मार्गास जातात. आळशी माणसाची देवपूजा ही देखील परमेश्वाराची फसवणूक



Scanned with OKEN Scanner

आहे. जीवन हा शेअर बाजार नाही. वस्तुभांडार नाही.ती एक प्रांजल व पारदर्शक अशी परिश्रमकथा आहे.' महात्मा बसवेश्वर म्हणत; जो स्वतः श्रम करतो त्याला इतरांच्या श्रमाची किंमत कळते. तो इतरांना कामाला जुंपून आपण आळसात काळ कंठणार नाही. माणसाने शरीर श्रमाचा गौरव करावा. ईश्वराने आपल्या देहाची रचनाच अशा पद्धतीने केली आहे की, आपल्या हातून काही तरी विधायक काम घडून यावे. केवळ बसून देह धारणाकरणे चुकीचे आहे. कायक हे सत्य आहे, ती वस्तुस्थिती आहे. कायकावाचूनकर्म नाही. त्यामुळे आळस सोडूनदेऊन मनोभावेकामे करीत राहणे, धडपड करणे. आपल्या हातांनी आपले जीवन अर्थपूर्ण करणे असाच अर्थ 'कायकवेकैलास' या त्यांनी सांगीतलेल्या तत्वाचा तसेच कालसापेक्ष अर्थ म्हणून आपणा सध्यानी घ्यावा लागतो. असा विचार केल्यास वीर शैव तत्वज्ञानाचे प्रतिपादक महात्मा बसवेश्वर यांनी जे कायकवेकैलास हे तत्व सादर केले ते मानवी जीवन पूर्तीच्या कर्तव्यनिष्ठ तत्वज्ञानाचोजणू सारच आहे असे म्हणावे लागते. ज्यातूनत्यांची महानता व कालातितता लक्षात येते.

निष्कर्ष :

महात्मा बसवेश्वरांनी १२ व्या शतकात 'अनुभवमंटप' या संस्कारपीठाची स्थापनाकरून'दासोह' प्रमाणे 'कायकवेकैलास' या संकल्पनेचा आदर्श उभा केला. ज्यातीलतत्वज्ञान लोककल्याणकारी व उदात्त अशा स्वरूपाच्या तत्वज्ञानाचा मुलाधार ठरणारे आहे. तसेच प्रतिष्ठित समाजात बांधव्य वाढीस लागते हे दाखवूनदिले. 'आधीकेले मग सांगितले' या विचाराप्रमाणे सत्यस्वरूपी व तर्क शुद्ध कार्य केले. त्यांची 'कायकवेकैलास' ही संकल्पना शिवतत्वाचा साक्षात्कार घडवते. त्यांच्याकडे आपण महामानव म्हणून पाहतो किंवा त्यांचा विपयीची श्रद्धा अढळ होते. याचे मूळ त्यांनी चिरंतन मानवी मूल्यांसाठी केलेल्या कार्यात सापडते. 'कायकवेकैलास' या संकल्पनेचे आद्यजनकमहात्मा बसवेश्वर असल्याचे सुचित होते. सामाजिक संतुलन व नैतिककर्तव्याच्या आशयाने ठासून भरलेली ही संकल्पना आहे. जे शरीरलाखरेधर्मसाधन मानताततेकष्ट हीच खरी उपासना समजतात. परिश्रमयुक्तकर्म यातच खरी विधायक तादडलेली आहे. त्यामुळे श्रमास प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे किंवा श्रम करणाऱ्याचा सन्मान मिळवून देणारे 'कायकवेकैलासी' हे नीतिमूल्य प्रतीत झालेले दिसते. या सिद्धांता ने जीवनाची सार्थकता सत्कार्यात आहे ती जीवन विन्मुखतेत नाही असे प्रतिपादन केले. आजही व्यक्ती, समाज, देश स्वास्थासाठी हा मुलमंत्रउपयोगी पडतो. १२ व्या शतकात त्यांनी केलेला हा प्रयोग आजही आठवावा व अनुसरावा एवढा आदर्शवत आहे. तेव्हा 'कायकवेकैलास' हा मुलमंत्र आचरणात आपल्यास समाजाचा सर्वांगीण विकास होण्यास वेळ लागणार नाही . आजच्या तरूणांनी हे आचार व विचार आचरणात आणावेत. माणसाने विविध प्रकारच्या कार्यातून समाज सेवा करणाऱ्या व्यक्तींचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून, आचरणकेल्यास समाज परिवर्तन होण्यास वेळ लागणार नाही.आजच्या लोकसभा, विधानसभा या अनुभवमंटपाप्रमाणे झाल्या आणिनागरिकांनीकायकाचा अवलंब केलातर मानवकुळाचा भाग्योदय लवकरघडेल. कारण 'कायकवेकैलास' या तत्वाततेवढे श्रेष्ठत्व व सामर्थ्य आहे. महात्मा बसवेश्वरांचे जीवन हाच संदेश बनला.ज्या संदेशाने जगाला आकर्षित केले.त्यातूनत्यांचे असामान्य, कालातित व्यक्तिमत्व पुढे आलेले दिसते.

संदर्भग्रंथ :

१. प्राचार्य शिवाजीराव भोसले, 'हितगोष्टी', ॐ अक्षरब्रम्ह प्रकाशन पूणे, सहावी आवृत्तीजूलै २०१३.

२. प्राचार्य शिवाजीराव भोसले, 'प्रेरणा', अक्षर ब्रम्ह प्रकाशन, पूणे सातवी आवृत्ती २०१२.

३. एच. तिपेरूद्रस्वामी (मूळ लेखक), रोहिणी तुकदेव (अनुवादक) 'भारतीय साहित्याचे निर्माते बसवेश्वर', साहित्य अकादमी, प्रथमावृत्ती २०११.

४.श्रीनिवास सातभाई 'आधुनिक भारताचा इतिहास' (ई.स. १७६२ ते १९५०) विद्याबुक्स पब्लिकेशर्स, औरंगाबाद, प्रथमावृत्तीजून २००८.

❑❑❑



Scanned with OKEN Scanner